# PAPER-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________
2. (Signature) ____________________________
   (Name) ____________________________

OMR Sheet No. : ..............................................

(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No. ____________________________

(In words)

| J | 3 | 8 | 1 | 3 |
|---|---|---|---|---|

Time : 2 $^1/_2$ hours] [Maximum Marks : **150**

Number of Pages in this Booklet : **12** | Number of Questions in this Booklet : **75**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of seventy five multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal / polythene bag on the booklet. Do not accept a booklet without sticker-seal / without polythene bag and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** Ⓐ Ⓑ ● Ⓓ
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are however, allowed to carry duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचहत्तर बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए पुस्तिका पर लगी कागज की सील / पोलिथीन बैग को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील / बिना पोलिथीन बैग की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण** : Ⓐ Ⓑ ● Ⓓ जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें । हालांकि आप परीक्षा समाप्ति पर OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई अंक काटे नहीं जाएँगे ।**

# MARATHI
# मराठी
## Paper – III
## प्रश्नपत्रिका – III

**Note :** This paper contains **seventy five (75)** objective type questions of **two (2)** marks each. **All** questions are compulsory.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले **75 (पंचाहत्तर)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन गुण** आहेत. **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

**1.** ते मऱ्हाटे बोल रसिक : वरि दावीन देशीयेचे बिक

म्हणैन सव्याख्यान श्लोक : मिसे वोवियेचेनि

हा 'पुण्यपावन मराठी' बद्दलचा भाषाभिमान कोणी व्यक्त केला ?

(A) एकनाथ

(B) नरेंन्द्र

(C) दामोदर पंडित

(D) पंडित विश्वनाथ

**2.** हे पापाची उत्तरपेठ: हे नरकाची राजवट

मुक्तीचे वज्रकपाट : कामिनी हे - ही स्त्रीनिंदा कोणी केली ?

(A) म्हाइंभट

(B) नागदेवाचार्य

(C) भास्करभट्ट बोरीकर

(D) नारायणपंडित

**3.** नमो रामराया । नमो रामाराया ।

येऊं दे सदया । करुणा माझी ।।

अखंडित मन । जडो तुझे पायीं ।

देसी तरी देई । वर हाचि ।। - ही विनवणी कोणी केली ?

(A) रामदास

(B) वेणाबाई

(C) बहिणाबाई

(D) गिरिधरस्वामी

**4.** ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | कर्मतत्त्व | e. | निरंजनमाधव |
| b. | शतमुखरावणवधाख्यान | f. | श्रीधर |
| c. | वेदान्तसूर्य | g. | मुक्तेश्वर |
| d. | श्रीकृष्णविजय | h. | मोरोपंत |
| | | i. | वामनपंडित |

(A) a – g, b – f, c – i, d – h

(B) a – i, b – g, c – f, d – h

(C) a – h, b – f, c – e, d – g

(D) a – f, b – i, c – e, d – g

**5.** बिंबादी घराण्यांचा प्राकृत इतिहास जिला म्हणता येईल, अशी बखर कोणती ?

(A) मराठी साम्राज्याची छोटी बखर

(B) हरिवंशाची बखर

(C) महिकावतीची बखर

(D) राक्षसतागडीची बखर

**6.** पुढील रचना कोणाची ?

जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनी द्वापारांत ।

तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगांत अति आनंदात ।।

(A) रामजोशी

(B) होनाजी

(C) प्रभाकर

(D) परशराम

**7.** संपादने आणि कवी यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | उमाळा | e. | बी |
| b. | प्रणयप्रभा | f. | चंद्रशेखर |
| c. | फुलांची ओंजळ | g. | रहाळकर |
| d. | कुंजकूजन | h. | भा. रा. तांबे |
| | | i. | द. रा. बेंद्रे |

(A) a – g, b – f, c – i, d – h
(B) a – i, b – h, c – e, d – f
(C) a – h, b – f, c – e, d – g
(D) a – f, b – i, c – e, d – g

**8.** पुढील कथासंग्रह कालानुक्रमे लावा :
(A) हिरवे रावे, गावाकडील गोष्टी, श्रीशिल्लक, ऊन
(B) ऊन, हिरवे रावे, गावाकडील गोष्टी, श्रीशिल्लक
(C) हिरवे रावे, ऊन, श्रीशिल्लक, गावाकडील गोष्टी
(D) हिरवे रावे, ऊन, गावाकडील गोष्टी, श्रीशिल्लक

**9.** पुढील ललित गद्य लेखसंग्रह कालानुक्रमे लावा :
(A) पैस, कोवळी उन्हे, सोन्याचा पिंपळ, किमया
(B) किमया, पैस, कोवळी उन्हे, सोन्याचा पिंपळ
(C) किमया, कोवळी उन्हे, सोन्याचा पिंपळ, पैस
(D) किमया, कोवळी उन्हे, पैस, सोन्याचा पिंपळ

**10.** पुढीलपैकी कोणते नाटक जॉर्ज ऑरवेलच्या अनिमल फार्म या कादंबरीचे नाट्यरूपांतर आहे ?
(A) वैजयंती
(B) क्रांति
(C) तारा
(D) कलम 302

**11.** अरुणोदय आणि सरलादेवी या सामाजिक नाटकांचे लेखक कोण ?
(A) शंकर परशराम जोशी
(B) सदाशिव अनंत शुक्ल
(C) वासुदेव वामन भोळे
(D) कृष्णाजी हरी दीक्षित

**12.** मीनाक्षीचे जीवन ही कादंबरी कोणी लिहिली आहे ?
(A) शांताबाई नाशिककर
(B) कृष्णाबाई मोटे
(C) मालतीबाई दांडेकर
(D) कमलाबाई सोहनी

**13.** एका मूळ भाषेपासून उद्‌भवल्यामुळे साधर्म्य असणाऱ्या भाषांच्या वर्गास काय म्हणतात ?
(A) प्रमाण भाषा
(B) देशभाषा
(C) भाषाकुल
(D) वाणी

**14.** मराठीचा उगम 'पिजिन' मध्ये आहे, असे कोणत्या भाषावैज्ञानिकाचे मत आहे ?
(A) साउथवर्थ
(B) ग्रियर्सन
(C) फ्रान्सिस एक्का
(D) लेकॉफ

**15.** स्वनिम हे भाषासापेक्ष असतात आणि स्वनांतरे विवक्षित भाषेपुरती खरी असतात.
(A) संपूर्ण विधान चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**16.** पुढीलपैकी कोणता निकष भाषा व बोली यांतील फरक व्यक्त करू शकत नाही ?

(A) भाषाकुलसाधर्म्य

(B) भूभाग

(C) एका राष्ट्रात समावेश

(D) दोन बोलींमधील भिन्नत्व

**17.** मांजरपाट, मलय, सार, चाटी हे शब्द मराठीत कोणत्या भाषेतून आले आहेत ?

(A) कन्नड

(B) हिंदी

(C) गुजराती

(D) तमिळ

**18.** जादूनेच तुझ्या बा रे । वन नंदन बनले सारे

त्या लहरींमधुनी झरती । दिव्य तुझ्या संगीततती

- या पंक्तींत कोणता काव्यगुण आहे ?

(A) ओजस्

(B) सौकुमार्य

(C) माधुर्य

(D) समता

**19.** हपूसचा आंबा म्हणजे नुसते अमृत आहे,

- हे वाक्य कोणत्या शब्दशक्तीचे उदाहरण आहे ?

(A) व्यंजना

(B) अभिधा

(C) तात्पर्यार्थ

(D) गौणी लक्षणा

**20.** मम्मटाने केलेले ध्वनिप्रकार हेमचंद्राने थोडक्यात आणले आणि अलंकारांची संख्या साठाहून छत्तीसावर आणल्यामुळे त्याचा 'काव्यानुशासन' हा ग्रंथ पाठ्यग्रंथ म्हणून महत्त्वाचा ठरतो.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**21.** क्रांतिरसाचे पुरस्कर्ते कोण ?

(A) के. ना. वाटवे

(B) अनिल

(C) शं. द. जावडेकर

(D) रा. श्री. जोग

**22.** करुणरसातसुद्धा अत्यंत सुख होते, अशी केवलानंदवादी भूमिका कोणाची ?

(A) रामचंद्र गुणचंद्र

(B) विश्वनाथ

(C) पतंजली

(D) जगन्नाथ

**23.** कल्पनाशक्तीचे दोन प्रकार कोणी मानले ?

(A) वर्डस्वर्थ

(B) कोलरिज

(C) एलियट

(D) टेनिसन

**24.** कलेचा अनुभव व्यक्तिगत असतो आणि म्हणून अनन्यसाधारण असतो याचे कारण हा अनुभव हा इतर अनुभवांसारखा ज्ञानेन्द्रिये आणि संकल्पनाशक्ती यांच्या मध्यस्थीने आलेला अनुभव नसतो.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**25.** समीक्षासंबद्ध सिद्धान्त आणि विचारवंत यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | उत्तरआधुनिकवाद | e. | रोमान याकोबसन |
| b. | साहित्यिक ज्ञानक्षमता | f. | झां ल्योतार |
| c. | संरचनावाद | g. | रेने वेलेक |
| d. | सांस्कृतिक अधिसत्ता | h. | अन्तोनिओ ग्रामची |
| | | i. | जोनाथन कलर |

(A) a – f, b – i, c – e, d – h
(B) a – i, b – h, c – e, d – f
(C) a – h, b – f, c – e, d – g
(D) a – f, b – i, c – e, d – g

**26.** स्टाइल या शब्दाला पर्याय म्हणून शैली हा शब्द कोणी वापरला ?

(A) जनार्दन सखाराम गाडगीळ
(B) गणेशशास्त्री लेले
(C) कृष्णशास्त्री चिपळूणकर
(D) कृ. बा. मराठे

**27.** विफलता, असुरक्षिता आणि यातनामय कलह यांपासून माणसाची सुटका नाही; या गोष्टींशी सामना करणे म्हणजे खरे जगणे हा कोणत्या वादाचा (इझमचा) निष्कर्ष आहे ?

(A) उत्तरआधुनिकतावाद
(B) वसाहतोत्तरवाद
(C) अतिवास्तववाद
(D) अस्तित्ववाद

**28.** कथा व कादंबरी हे साहित्यप्रकार कशामुळे वेगळे ठरतात ?

(A) रचनेचे एककेंद्रियत्व व बहुकेंद्रियत्व
(B) वाचनास लागणारा कालावधी
(C) जीवनानुभवाची व्याप्ती
(D) निवेदनतंत्र

**29.** नाटक या कलाप्रकाराचा विशेष कोणता ?

(A) दृश्यात्मकता
(B) साहित्यमूल्य व प्रयोगमूल्य यांचे सह-अस्तित्व
(C) नेपथ्य
(D) रंगमंचाचे व्यवस्थापन

**30.** चरित्र व आत्मचरित्र यांना वेगळा करणारा घटक कोणता ?

(A) स्वत:ची जीवनगाथा व दुसऱ्याची जीवनगाथा
(B) विवेचनपद्धतीतील वेगळेपण
(C) समकालीन समाजस्थितीचे दर्शन
(D) व्यक्तिदर्शनातील वैविध्य

**31.** काव्यविषयक ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | मराठी कविता | e. | वा.ल. कुळकर्णी |
| b. | कविता आणि रसिकता | f. | सुधीर रसाळ |
| c. | मराठी कविता : जुनी आणि नवी | g. | निशिकांत ठकार |
| d. | काही मराठी कवी : जाणिवा आणि शैली | h. | रा.ग. जाधव |
| | | i. | गो. म. कुलकर्णी |

(A) a – g, b – h, c – e, d – f
(B) a – i, b – h, c – e, d – f
(C) a – h, b – f, c – e, d – g
(D) a – f, b – i, c – e, d – g

**32.** माणसासाठी धर्म आहे. म्हणजे प्रत्येक मनुष्याला आपली ऐहिक उन्नती नीतिमार्गाने चालून संपादण्याला धर्माचे साह्य झाले पाहिजे. - हे प्रतिपादन कोणी केले ?

(A) लोकहितवादी
(B) रा.गो. भांडारकर
(C) जोतीराव फुले
(D) बाबासाहेब आंबेडकर

**33.** शेतीमालाच्या भावाचा प्रश्न उपस्थित करून जमिनीचे फेरवाटप झाले पाहिजे हा शेतीसुधारणेचा क्रांतीकारी विचार कोणी मांडला ?

(A) जोतीराव फुले

(B) विठ्ठल रामजी शिंदे

(C) महादेव गोविंद रानडे

(D) सार्वजनिक काका

**34.** 1805 मध्ये इंग्लिशमधून मराठीत भाषांतर झालेले पहिले पुस्तक कोणते ?

(A) बाळमित्र (भाग 1)

(B) यात्रेकऱ्याचा वृत्तांत

(C) यात्रिक क्रमण

(D) शुभवर्तमान

**35.** स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून कोणी आंदोलन केले ?

(A) रा. गो. भांडारकर

(B) रमाबाई रानडे

(C) गोपाळ गणेश आगरकर

(D) गोपाळ कृष्ण गोखले

**36.** स्त्रियांच्या दुःस्थितिनिवारणासाठी विधवाविवाहाचा कायदा, संमतिवयाचा कायदा, स्त्रीशिक्षणाची चळवळ, विषम विवाहास विरोधी वातावरणाची निर्मिती अशा अनेक सुधारणा झाल्या तसेच स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याचेदेखील बरेच प्रयत्न झाले.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**37.** धर्मसुधारणावादी चळवळींचा मराठी वाङ्मयावर कोणता परिणाम झाला ?

(A) रुढिपरंपरांचा पुनर्विचार करणारे वैचारिक साहित्य निर्माण झाले.

(B) धर्मसुधारणेस विरोध करणारे लेखन निर्माण झाले.

(C) हिंदू धर्माची पाठराखण करणारे ग्रंथ निर्माण झाले.

(D) धर्मसुधारणेस अनुकूल वातावरण उत्पन्न व्हावे अशा हेतूने साहित्यनिर्मिती झाली.

**38.** ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | कुटुंब प्रवर्त्तननीति | e. | स.का. छत्रे |
| b. | फलमुनी आणि करुणा | f. | केशव लक्ष्मण जोरवेकर |
| c. | बाळमित्र | g. | मिसेस फरार |
| d. | अवलिया | h. | विनायक बाळकृष्ण दामले |
| | | i. | मिसेस मुलेन्स |

(A) a – g, b – i, c – e, d – h

(B) a – i, b – h, c – e, d – f

(C) a – h, b – f, c – e, d – g

(D) a – f, b – i, c – e, d – g

**39.** प्रार्थना समाजाच्या आचारांमध्ये स्त्रीविषयक उदारता, जातिभेदविरहितता अशा सुधारणा असून त्यांच्या स्त्रीशिक्षण, बालविवाह-विरोध आणि विधवाविवाहपुरस्कार याबद्दलच्या चळवळींचे प्रतिबिंब त्या ललित वाङ्मयामध्ये पडले आहे.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**40.** वैचारिक ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | शनिदेव उर्फ साडेसातीचा देव | e. | विनायक दामोदर सावरकर |
| b. | बहिष्कृत भारत | f. | बाबासाहेब आंबेडकर |
| c. | काकगर्जना | g. | लोकहितवादी |
| d. | मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव | h. | गोपाळ गणेश आगरकर |
| | | i. | विठ्ठल रामजी शिंदे |

(A) a – h, b – i, c – f, d – e
(B) a – i, b – h, c – e, d – f
(C) a – h, b – f, c – e, d – g
(D) a – h, b – i, c – e, d – f

**41.** पुढील घटना कालक्रमानुसार लावा :

(A) डिप्रेस्ड क्लास मिशनचा आरंभ, कोल्हापूर संस्थानात स्पृश्यास्पृश्यांना समान लेखणारा कायदा, दलित चळवळीच्या प्रसारार्थ मूकनायक पाक्षिकाचा आरंभ, मुंबई येथे बहिष्कारिणीहितसभेची संस्थापना

(B) मुंबई येथे बहिष्कारिणीहितसभेची संस्थापना, डिप्रेस्ड क्लास मिशनचा आरंभ, कोल्हापूर संस्थानात स्पृश्यास्पृश्यांना समान लेखणारा कायदा, दलित चळवळीच्या प्रसारार्थ मूकनायक पाक्षिकाचा आरंभ

(C) दलित चळवळीच्या प्रसारार्थ मूकनायक पाक्षिकाचा आरंभ, मुंबई येथे बहिष्कारिणीहितसभेची संस्थापना, डिप्रेस्ड क्लास मिशनचा आरंभ, कोल्हापूर संस्थानात स्पृश्यास्पृश्यांना समान लेखणारा कायदा

(D) कोल्हापूर संस्थानात स्पृश्यास्पृश्यांना समान लेखणारा कायदा, दलित चळवळीच्या प्रसारार्थ मूकनायक पाक्षिकाचा आरंभ, मुंबई येथे बहिष्कारिणीहितसभेची संस्थापना, डिप्रेस्ड क्लास मिशनचा आरंभ

**42.** सती जाणे, जलसमाधी घेणे, पोरे मारणे, प्रयागास करवत घेणे, जगन्नाथास रथ उरावर घेणे व हिमालयात स्वर्गास जाणे, इत्यादी अघोरी व लज्जास्पद चालींमुळे ईश्वराचा क्षोभ अत्यंत जाहला. तेव्हा दुष्ट लोकांस ताळयावर आणण्यास ईश्वराने इंग्रज सरकारची योजना केली. - हे विचार कोणी मांडले ?

(A) जोतीराव फुले
(B) गोपाळ गणेश आगरकर
(C) लोकहितवादी
(D) कृष्णशास्त्री चिपळूणकर

**43.** मुंबईची सदा दिवाळी पाहून या आधुनिक व ऐहिक कुबेरनगरीतील लोकांप्रमाणेच या देशातील इतर शहरांतले किंवा गावांतले लोक धनाढ्य असतील असा तर्क करणे म्हणजे लग्नकार्यात आमचे लोक जो शक्तीबाहेर खर्च करताता त्यावरून ऐपतीचा अंदाज करण्याइतके वेडेपणाचे काम होणार आहे. - हे उद्गार कोणी काढले आहेत ?

(A) जोतीराव फुले
(B) गोपाळ गणेश आगरकर
(C) लोकहितवादी
(D) कृष्णशास्त्री चिपळूणकर

**44.** भक्तिसाहित्याच्या चळवळीने कोणते कार्य केले ?

(A) जनसामान्यांना अध्यात्म्याची गोडी लावली.
(B) सर्व समाज लेखनाभिमुख झाला.
(C) ज्ञान, कर्म व योग या मार्गांच्या तुलनेत भक्तिमार्गाची सुलभता जनमानसावर बिंबवली.
(D) सामान्य जनतेचे प्रबोधन केले.

45. पुढील वाङ्मयीन नियतकालिके कालक्रमानुसार लावा :
(A) रत्नाकर, यशवंत, पारिजात, साधना साप्ताहिक
(B) यशवंत, पारिजात, साधना साप्ताहिक, रत्नाकर
(C) पारिजात, साधना साप्ताहिक, रत्नाकर, यशवंत
(D) साधना साप्ताहिक, रत्नाकर, यशवंत, पारिजात

46. दलित साहित्याच्या चळवळीमागील कारणे ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या कारणांशी पूर्णपणे जुळणारी असून या दोन्ही साहित्यप्रवाहांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे.
(A) संपूर्ण विधान चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

47. नियतकालिके आणि संपादक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | वैखरी | e. | पुरुषोतम आत्माराम चित्रे |
| b. | मौज | f. | वि.पां. देऊळगावकर |
| c. | मांडवी | g. | श्रीराम पांडुरंग कामत |
| d. | अनुबंध | h. | अनंत हरी गद्रे |
| | | i. | नि. ना. रेळेकर |

(A) a – h, b – i, c – e, d – f
(B) a – i, b – h, c – g, d – f
(C) a – h, b – f, c – e, d – g
(D) a – h, b – i, c – f, d – e

48. म्हणुनि विजनीं मी जातें स्वच्छंदे त्या आळवितें - ही पंक्ति कोणत्या कवीची आहे ?
(A) कुसुमाग्रज
(B) केशवसुत
(C) बालकवी
(D) मंगेश पाडगावकर

49. हॅर्टाच्या जर्मन प्रियकराचे नाव काय ?
(A) लुई
(B) जॉन
(C) बॉब
(D) कार्ल

50. प्र. ई. सोनकांबळे यांचे जन्मगाव कोणते ?
(A) चेरा
(B) जगळपूर
(C) सुल्लाळी
(D) हाडोळती

51. लोकसाहित्यात आलेल्या अनेक गोष्टी वर्तमान जीवनाचे अभिलेख आहेत, हे विधान कोणाचे ?
(A) थॉमस बिशप पर्सी
(B) जॉन बोआस
(C) ए. डबल्यू. श्लेगेल
(D) एफ. ए. चाइल्ड

52. उत्पत्तीकथा या हेतुगर्भ आहेत असे कोणत्या संप्रदायात नोंदलेले आढळते ?
(A) स्पष्टीकरणवादी संप्रदाय
(B) भाषाशास्त्रीय संप्रदाय
(C) मानसशास्त्रीय संप्रदाय
(D) अवशेषवादी संप्रदाय

53. लोकसाहित्याचा तुलनात्मक पद्धतीने अभ्यास कोणी सुरू केला ?
(A) लेवी स्ट्रॉस
(B) फ्रँज बोअस
(C) सी.एस. बर्न
(D) व्लादिमीर प्रॉप

**54.** सोफिया बर्न हिने केलेल्या लोकसाहित्याच्या त्रिविध वर्गीकरणात पुढीलपैकी कोणता घटक नाही ?

(A) आदिम लोकविश्वास

(B) लग्न, सत्ताग्रहणादींशी संबंधित आचारविचार

(C) प्रयोगरूप लोककला

(D) धर्मकथा, लोककथा, लोकगीते इत्यादी

**55.** पुढील गीतातून कोणता अर्थ सूचित होतो ?

भाऊ म्हणीतो बहेणीला, घाला रोटी
बोले भावजई, गहू जेमिनीच्या पोटी
भाऊ म्हणीतो बहेणीला, घाला दाळं
भावजई म्हने, तुरी गेल्या रानोमाळं
भाऊ म्हणीतो बहेणीला, घाला दूद
बोले भावजई, वासरं पेले आज

(A) भावा-बहिणीचे प्रेम

(B) नणंद-भावजय नातेसंबंध

(C) खेड्यातील घराघरात आढळणारे दारिद्र्य

(D) नणंदेची उपेक्षा

**56.** भारतीय साहित्याची मूल एकात्मता केवळ आशयविषयांच्याच पातळीवर थांबत नाही, रचनाबंध आणि पारंपरिक साहित्यप्रकारांमध्येही ही एकात्मता आढळून येते.

(A) संपूर्ण विधान चक्र

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**57.** भारतीय साहित्य एकच आहे, परंतु ते अनेक भाषांमधून लिहिले जाते, हे विधान कोणाचे ?

(A) रवीन्द्रनाथ टागोर

(B) मॅक्समुल्लर

(C) डॉ. राधाकृष्णन

(D) बंकिमचंद्र चटोपाध्याय

**58.** तौलनिक साहित्याभ्यासाचे कार्य कोणते नक्की नाही ?

(A) भिन्न भाषांतील साहित्यांचा अभ्यास

(B) एका साहित्याचा दुसऱ्या साहित्यावरील प्रभाव अभ्यासणे

(C) एका साहित्याकडून दुसऱ्या साहित्याने केलेल्या स्वीकाराचा अभ्यास करणे

(D) दोन साहित्यांची तुलना करून त्यांतील सरस-नीरस ठरविणे

**59.** सदृश संस्कृति, सदृश समाजव्यवस्था, सदृश आर्थिक व्यवस्था, सदृश राजकीय वातावरण, सदृश साहित्यिक गरजा यांपैकी कोणत्याही कारणांमुळे दोन साहित्यांत साधर्म्य उत्पन्न होईलही; पण तेथे ‘देते’ साहित्य आणि ‘घेते’ साहित्य असे नाते संभवत नाही, प्रत्येक वेळी तेथे ‘प्रभाव’ शोधणे बरोबर ठरणार नाही.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**60.** विश्वसाहित्य म्हणजे काय नव्हे ते सांगा :

(A) स्थल-कालांची सीमा ओलांडून सर्वत्र आस्वाद्य ठरलेल्या साहित्यकृती

(B) मनुष्यसमाजाच्या एकतेचे दर्शन घडविणारे भिन्न भिन्न भाषांतील साहित्य

(C) विश्वातील यच्चयावत साहित्यसंपदा

(D) आपल्या भाषेतील साहित्याची परंपरा न सोडता विश्वात्मकतेचा आविष्कार घडविणारे साहित्य

**61.** स्त्रीत्वाची संकल्पना (नाजूक, गोड, लाजरी, विनयशील, कर्तव्यदक्ष गृहिणी इत्यादी) हा समाज व संस्कृती यांनी घडविलेला एक साचा आहे; या साच्याचे खरे स्वरूप लपवून त्याला स्त्रीचा स्वभाव मानण्याची चाल पुरूष खेळत असतो.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**62.** स्त्रीवादी साहित्याभ्यासाचे स्वरूप स्पष्ट करणारे ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा : (साहित्यकृति आणि साहित्यिक यांच्या जोड्या लावा :)

| | | | |
|---|---|---|---|
| a. | अ लिटररिचर ऑफ देअर ओन | e. | केट मिले |
| b. | विमेन रायटिंग इन इण्डिया | f. | वर्जिनिया वूल्फ |
| c. | अ रूम ऑफ वन्स ओन | g. | सॅण्ड्रा गिल्बर्ट व सुझन गुबर |
| d. | सेक्स्च्युअल पॉलिटिक्स | h. | एलन शोवॉल्टर |
| | | i. | सुझी थारू व के. ललिता |

(A) a – h, b – i, c – e, d – f

(B) a – i, b – h, c – g, d – f

(C) a – h, b – f, c – e, d – g

(D) a – h, b – i, c – f, d – e

**63.** पुढील आत्मचरित्रे प्रकाशनाच्या कालक्रमानुसार लावा :

(A) स्मरणसाखळी, आमची अकरा वर्षे, द्रौपदीची थाळी, माझी कहाणी

(B) आमची अकरा वर्षे, द्रौपदीची थाळी, माझी कहाणी, स्मरणसाखळी

(C) द्रौपदीची थाळी, माझी कहाणी, स्मरणसाखळी, आमची अकरा वर्षे

(D) माझी कहाणी, स्मरणसाखळी, आमची अकरा वर्षे, द्रौपदीची थाळी

**64.** पुढीलपैकी कोणते काव्यसंपादन शांता शेळके यांच्या कवितांचे असून ते प्रभा गणोरकर यांनी केले आहे ?

(A) भरली घागर

(B) मृण्मयी

(C) पद्मपत्र

(D) किनारे मनाचे

**65.** पुढीलपैकी कोणाचे कादंबरीलेखन लोकप्रिय साहित्य म्हणता येत नाही ?

(A) सुमती क्षेत्रमाडे

(B) ज्योत्स्ना देवधर

(C) आशा बगे

(D) कुसुम अभ्यंकर

**66.** साहित्यकृति आणि साहित्यिक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | दंडकारण्यातील रम्य रात्री | e. | चिं. व्यं. मराठे |
| b. | रानभुली | f. | ग. दि. माडगूळकर |
| c. | काशीयात्रा | g. | महादेव मोरे |
| d. | गावरानी गोष्टी | h. | र. वा. दिघे |
| | | i. | गो. नी. दांडेकर |

(A) a – h, b – i, c – e, d – f

(B) a – i, b – h, c – g, d – f

(C) a – h, b – f, c – e, d – g

(D) a – h, b – i, c – f, d – e

**67.** ग्रामीण जीवनदर्शन घडविणाऱ्या लेखकांत सर्वंकष परिवर्तनाची आकांक्षा असली, तरी त्यांच्या साहित्याची झेप परिवर्तनाची स्पंदने टिपण्यापलीकडे जात नाहीत.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

68. खेडेगावातील सत्ताकारण, त्यातील स्पर्धा, हेवेदावे आणि व्यूहरचना असे चित्रण कोणत्या साहित्यकृतीत झालेले आढळते ?

(A) वावटळ

(B) टारफुला

(C) होरपळ

(D) साहेब

69. माडगूळकरांची कथा माणसे व त्यांच्या भोवतीची परिस्थिती यांच्या संबंधांवर व संघर्षावर स्थिर होते, तर शंकर पाटलांची कथा मानवी मनातील अंतर्गत संघर्षावर व आंदोलनावर स्थिर होते.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

70. खेडेगावातला रिकामटेकडेपणा हे माझ्या विनोदाचे मुख्य भांडवल आहे. - हे उद्‌गार कोणाचे ?

(A) शंकर पाटील

(B) द. मा. मिरासदार

(C) रा. रं. बोराडे

(D) भास्कर चंदनशिव

71. उच्च शिक्षणामुळे उच्च पदावर गेलेल्या दलितांच्या उपरेपणाच्या मानसिकतेचा उपहास करणाऱ्या कथा कोणी लिहिल्या ?

(A) तु. लिं. कांबळे

(B) अमिताभ

(C) शरणकुमार लिंबाळे

(D) शंकरराव खरात

72. प्रश्न सुटेल कसा रूढीच्या गुलामाचा

कशी फोडाल इथे आमच्या दु:खाला वाचा

उत्तर द्यावे तुम्ही माझ्या खड्या प्रश्नाचे

मने मारून जिणे जगू नका श्वानाचे

- या पंक्ती कोणाच्या ?

(A) राजानंद गडपायले

(B) रावजी सावळाराम गडकरी

(C) वामन कर्डक

(D) भीमराव आढांगळे

73. पुढीलपैकी कोणते लेखन दलित आत्मकथन नाही ?

(A) रात्रंदिन आम्हा...

(B) झुंज

(C) वस्ती

(D) मातीचे आकाश

74. पुढीलपैकी कोणती नाट्यकृती कमलाकर डहाट यांची आहे ?

(A) साक्षीपूरम

(B) मन्वंतर

(C) बाजार

(D) झुंबर

75. भारतातील जातिभेद आणि त्यावरील उपाय या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) नामदेव व्हटकर

(B) ज. वि. पवार

(C) अर्जुन डांगळे

(D) गंगाधर पानतावणे

**Space For Rough Work**